Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# '' महाराष्ट्र राज्याच्या कोकण व उत्तर महाराष्ट्र महसूल विभागात युवक कल्याण योजना अंतर्गत स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय तुलनात्मक अभ्यास ''

*प्रविण लामखाडे*

राणी इंदिराबाई भोसले महा.कुही, तह.कुही, जि.नागपूर

***सारांशः***

भारत हा युवकांचा देश आहे. 18 ते 35 वयोगटातील अंदाजे 48 करोड युवकांची संख्या असून ती महानगरात, लहान नगरात व खेडयात विभागली आहे. राष्ट्र उभारणीच्या कार्यक्रमासाठी ही युवाशक्ती वापरण्याचा दृष्टीकोन समोर ठेवून युवकांच्या व समाजाच्या गरजांना प्राधान्य देणे महत्वाचे आहे. त्याकरिता युवक कल्याण कार्यक्रमाद्वारे युवकांचा शारीरिक विकास व सुदृढता शरीराच्या हालचालीमध्ये नैपुण्यता व पर्यायी व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यास मदत व्हावी म्हणून शासनाने क्रीडा धोरण 2001 अन्वये राबविण्यात आलेल्या युवक कल्याण योजना व राज्यातील कोकण व उत्तर महाराष्ट्र महसूल विभागातील सर्वसाधारण व एस.सी.पी. वर्गाकरीता शासनाने 2002–2008 आर्थिक वर्षात केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय याचा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे.

**प्रस्तावना -**

युवक कोणाला म्हणावे या प्रश्नाचे अनेक उत्तर देता येतील. भारत सरकारने व्यक्तीचं वय आधार ठरवून 18 ते 35 वयोगटातील व्यक्तीला युवक म्हणून मान्यता दिली आहे. आज देशाच्या लोकसंख्येत 18 ते 35 वयोगटातील अंदाजे 48 करोड युवकांची संख्या असून ती महानगरात, लहान नगरात व खेडयात (ग्रामीण) भागात विभागली आहे. ही युवाशक्ती देशाची दशा व दिशा बदलविण्यास समर्थ आहे. आजच्या युवकात अदम्य इच्छाशक्ती, आकाशात झेप घेण्याची महत्वाकांक्षा, आपले जीवन समृध्द व संपन्न बनविण्याची दृढता. जगात 2020 पर्यंत भारत महाशक्तीचं रूप धारण करील या भविष्यवाणीची पुर्तता करण्याची इच्छाशक्ती व आत्मविश्वास आहे. त्यांच्यामध्ये असलेल्या प्रभावशाली व सुप्त गुणांचा विकास करून त्यांच्या या ऊर्जेचा उपयोग समाज व राष्ट्रनिर्मीतीसाठी वापरण्याकरिता त्यांच्या गरजांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

युवकांचा वैयक्तिक व सामाजिक दृष्टया सर्वांगीण विकास करून त्यांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी एकरूप करण्याकरिता ''महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण 2001'' अंतर्गत युवक कल्याण कार्यक्रम राबविण्यात आले. जग रोज बदलत आहे आणि बदलत जाणार आहे. आपल्या समाजातील व देशातील प्रश्न आपल्या समोर आहेत. जागतिकीकरणामुळे नव्याने भविष्यात अनेक प्रश्न निर्माण होणार आहेत, नवीन आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्याकरीता युवक कल्याण कार्यक्रमाद्वारे युवकांचा शारिरीक विकास व सुदृढता शरीराच्या हालचालीमध्ये नैपुण्यता व व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यास मदत व्हावी हा हेतू आहे. युवक कल्याण कार्यक्रमाचे सुसूत्रबध्द आयोजन व नियोजन करून युवकांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे, ज्यामुळे ते आपल्या जीवनातील, समाजातील व देशातील आव्हानांना समर्थपणे तोंड देऊ शकतील.

युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रम शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत. हे उपक्रम राबविण्याकरीता शासनाद्वारे आर्थिक सहाय्य केले जाते. शासनाने युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाकरिता 2002–2008 या कालावधीत राज्यातील महसूल विभागाकरीता केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय यांचा तुलनात्मक अभ्यास करून या योजनांचा लाभ युवकांना व समाजाला कितपत झाला वन झाल्यास सुधारणा सुचविणे अशी उद्यिष्ट सदरील अध्ययन करताना ठेवण्यात आले आहे.

***अभ्यासाची उद्यिष्टे :***

1.महाराष्ट्र शासन राबवित असलेल्या युवक कल्याण योजनेचा अभ्यास करणे.
2.युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत राज्यातील महसूल विभागावर, युवकांचा सर्वसाधारण वर्ग व (एस.सी.पी.) अनुसूचित जाती–जमाती वर्गावर 2002–2008 या कालावधीत केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय याचा तुलानात्मक अभ्यास करणे.
3.शासनाने राज्य क्रीडा धोरण 2001 अन्वये राबविलेली युवक कल्याण योजना कितपत यशस्वी झालेली आहे व कितपत झालेली नाही याची कारणे काय आहेत याचा शोध घेणे व उपाययोजना सुचविणे.
4.युवा शक्तीचा स्वतः व समाजाकरिता उपयोग योग्य दिशेने व्हावा याकरिता उपाययोजना सूचविणे.

***परिकल्पना :***

1.युवक कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांचा शारीरिक विकास व सुदृढता व व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यास मदत होते. त्याकरिता युवक कल्याण योजनेकरिता शासनाकडून होणारे आर्थिक सहाय्य याचा अभ्यास करणे.
2.युवकांचा सर्वांगीण विकास करून त्यांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी एकरूप करण्याची आज आवश्यकता आहे.

**Title :** *'' महाराष्ट्र राज्याच्या कोकण व उत्तर महाराष्ट्र महसूल विभागात युवक कल्याण योजना अंतर्गत स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय तुलनात्मक अभ्यास ''* **Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *प्रविण लामखाडे* **yr:2013 vol:3 iss:2**

*संशोधनाच्या मर्यादा :*

राज्यातील महसूल विभाग ''कोकण'' 06 व उत्तर महाराष्ट्र विभाग 04 एकूण 10 जिल्हयाचा समावेश संशोधनाकरीता करण्यात आला आहे.

***तथ्यांचे संकलन :*** संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून जिल्हयातील युवक केंद्र, युवक मंडळ, स्वयंसेवा युवक संघटना, युवक वसतिगृह, क्रीडातज्ञ, जिल्हा क्रीडा अधिकारी, युवा संघटनामधील पदाधिकारी यांची मुलाखत व प्रश्नावली साधनांचा वापर करून संशोधनाकरीता माहिती एकत्रीत करून खालील प्रमाणे विश्लेषण करण्यात आले.

*विश्लेषण :*

कोकण विभाग व उत्तर महाराष्ट्र विभागातील ग्रामीण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक संघटना क्रीडाधोरणानुसार आर्थिक सहाय्य योजनेच्या अंतर्गत आर्थिक तरतूद व व्यय.

*तालिका 1 :*

''सर्वसाधारण वर्गासाठी केलेली आर्थिक तरतूद व व्यय विवरण.''

| | कोकण विभाग | उत्तर महाराष्ट्र |
|---|---|---|
| तरतूद | 38.71 | 15.14 |
| प्रत्यक्ष खर्च | 38.71 | 15.14 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर | 100 % | 100 % |

वर्ष 2002–2008 पर्यंत कोकण विभागासाठी 38.71 लक्ष रूपये व उत्तर महाराष्ट्र विभागाकरिता 15.14 लक्ष रूपये इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार कोकण व उत्तर महाराष्ट्र विभागात निधीचा पूर्ण वापर करण्यात आला आहे.

वरील तालिकेवरून स्पष्ट होते की, कोकण व उत्तर महाराष्ट्र विभागात सर्वसाधारण वर्गाकरीता ग्रामिण व नागरी भागाकरीता स्वयंसेवी युवक संघटना आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत केलेली तरतूद व प्रत्यक्ष झालेला खर्च हयामध्ये फरक आढळत नाही.

*तलिका 2 :*

शासनाच्या क्रीडा धोरणानुसार ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक संघटना आर्थिक सहाय्य योजनेच्या अंतर्गत कोकण व उत्तर महाराष्ट्र विभागातील एस.सी.पी. (विशेष घटक योजना, अनुसूचित जाती जमाती) लाभार्थी वर्गासाठी केलेल्या आर्थिक तरतूदीचे व खर्चाचे विवरण.

| | कोकण विभाग | उत्तर महाराष्ट्र |
|---|---|---|
| तरतूद | 19.43 | 30.85 |
| प्रत्यक्ष खर्च | 19.43 | 30.85 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर | 100 % | 100 % |

ग्रामीण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक संघटनांस आर्थिक सहाय्य एस.सी.पी. योजनेंतर्गत वर्ष 2002–2008 पर्यंत कोकण विभाग 19.43 लक्ष रूपये तसेच उत्तर महाराष्ट्र विभागासाठी 30.85 लक्ष रूपये इतकी तरतूद करण्यात आली होती. दोन्ही विभागात संपूर्ण तरतूद केलेल्या आर्थिक सहाय्याच्या व्यय झालेला उपरोक्त तालिकेवरून दिसून येतो.

वरील तालिका क्रमांक दोन वरून स्पष्ट होते की, क्रीडाधोरणानुसार ग्रामीण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक संघटनास एस.सी.पी. आर्थिक सहाय्य या योजनेच्या अंतर्गत कोकण विभागासाठी 19.43 रूपये व उत्तर महाराष्ट्र विभागासाठी 30.85 रूपये तरतूद करण्यात आली होती. महाराष्ट्र शासन क्रीडा विभागातून उपलब्ध झालेल्या दस्तऐवजावरून स्पष्ट होते की, दोन्ही विभागात केलेल्या तरतूदीचा संपूर्ण व्यय झालेला उपरोक्त तालिकेवरून दिसून येतो.

एस.सी.पी. योजनेंतर्गत दोन्ही विभागात केलेल्या आर्थिक तरतूदींचा संपूर्ण व्यय झालेला दिसून येत असला तरी, महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातील दस्तऐवजावरून असे दिसून येते की, या योजनेंतर्गत 2002–2008 पर्यंत मुंबई उपनगरा करिता तरतूद करण्यात आली नाही. तसेच रत्नागिरी, सिंधूदुर्ग जिल्हया करीता 2006 ते 2008 हया आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत तरतूद करण्यात आली नाही.

एस.सी.पी. योजनेंतर्गत कोकण विभागातील 06 जिल्हयाकरीता 2002–2008 या आर्थिक वर्षात 19.43 लक्ष रूपये व उत्तर महाराष्ट्र विभागातील 04 जिल्हयाकरीता 30.85 लक्ष रूपये केलेली तरतूद कोकण विभागाच्या तुलनेत उत्तर महाराष्ट्रा करीता केलेली तरतूद व व्यय अधिक आहे.

*निष्कर्ष :*

1.आर्थिक, सामाजिक आणि नैतिक दृष्टीकोनातून पाहिल्यास स्वयंसेवी युवक संघटना समाजात युवकांच्या सर्वांगीण विकासाकरीता महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत.
2.सर्व प्रकारच्या स्वयंसेवी युवक संघटनात युवकांच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता असते. त्यांच्या जवळ उत्साही कार्यकर्ते आहेत. पण पूरेसे आर्थिक बळ नसते.

3.शालेय, महाविद्यालयीन, युवक कार्यक्रमांत स्वयंसेवी युवक संघटनांचा सहभाग अनिवार्य करावा.
4.आर्थिक सहाय्य प्राप्त करून घेण्याकरीता अमलात असलेली शासनाची पध्दत सोयीची नाही.
5.ग्रामीण भागातील युवक, स्वयंसेवी युवक मंडळ स्थापन करून युवक कल्याण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्यास उत्सुकता दिसून येते नाही.
6.आदिवासी विभागात स्वयंसेवी युवक कल्याण मंडळे स्थापून युवक कार्यक्रम राबविण्याच्या धोरणाची पूर्तता झालेली दिसून येत नाही.
7.शहरी भागातील स्वयंसेवी युवक संघटनेद्वारे युवक कल्याण कार्यक्रम राबवून युवकांचे मनोधैर्य उंचावण्याचे तसेच नैपुण्यप्राप्त खेळाडूंना माध्यमाद्वारे प्रसिध्दी देण्याचे कार्य केल्या जाते. पण ग्रामीण भागात त्याचा अभाव आहे.
8.शहरी भागातील स्वयंसेवी युवक संघटनेत युवतींचा सहभाग व वेगळी युवतींची संघटना दिसून येते.
9.ग्रामीण भागातील स्वयंसेवी युवक संघटनेत युवती सहभागी होत नाहीत व त्यांच्या वेगळया संघटनेचे प्रमाण अल्प आहे.
10.शहरी व ग्रामीण भागात राजकीय नेते आला हेतू साध्य करून घेण्याकरीता युवक संघटनेची स्थापना करतात व हेतू साध्य झाल्यानंतर त्या संघटनेकडे दुर्लक्ष करतात असे दिसून येते.
11.समन्याय तत्वाने राज्यातील प्रत्येक महसूल विभागाकरीता आर्थिक तरतूद न केल्यामुळे राज्यातील काही विभागात युवक कल्याण योजनांची आर्थिक कारणामूळे अद्यापी अंमलबजावणी झाली नाही असे दिसून येते.
12.युवक कल्याण कार्यक्रमाकरिता राज्याच्या अंदाजपत्रकात तरतूद कमी केल्या जाते व आर्थिक कारणामूळे केलेल्या तरतूदीचे योग्यवेळी व आवश्यकतेप्रमाणे वाटप केले जात नाही.
13.महाराष्ट्र राज्य युवक कल्याण मंडळावर राजकीय हेतूने प्रेरित झालेल्या व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्ती केली जाते. तसेच राजकीय कारणामुळे राज्य युवक मंडळाचे गठन होण्यास विलंब होतो. त्यामुळे युवक कल्याण उपक्रम राबवल्या जात नाहीत, असे दिसून येते.

### *उपाय योजना :*

1.युवक कल्याण केंद्रास अनुदान देण्याची पद्धत सरल व पारदर्शक असावी.
2.शहर व ग्रामीण युवकांच्या गरजा व त्यांच्या समाजाच्या गरजा वेगवेगळया आहेत. त्याप्रमाणे योजनांचे नियोजन करण्यात यावे.
3.आदिवासी विभागातील युवकांच्या गरजांची पूर्ती प्राधान्याने करावी.
4.युवक कल्याण केंद्रात राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप नसावा.
5.महाराष्ट्र राज्य युवक कल्याण मंडळावर क्रीडा व सांस्कृतिक विभागातील नैपुण्यप्राप्त व्यक्तींची निवड करावी.
6.शासनाच्या प्रचलित योजनांतील शेकडा 2 रूपये युवकांकरिता राखीव निधी ठेवावा व युवकांनी या योजनेत सहभागी व्हावे.
7.युवकांत श्रमप्रतिष्ठा निर्माण करण्याकरिता शासकीय योजनेत शिबीराचे आयोजन करून श्रम करून घ्यावे. त्यामुळे त्यांच्यात शिस्त निर्माण होईल.
8.स्वयंसेवी युवक मंडळात किंव युवतींचे वेगळे स्वयंसेवी मंडळ स्थापन्याकरीता त्यांना प्रोत्साहित करणे व आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
9.स्वयंसेवी युवक मंडळाच्या उपक्रमात सातत्य टिकविण्याकरीता स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक संस्था यांचे सहकार्य असावे.
10.ग्रामीण व आदिवासी भागात युवक केंद्र व त्या ठिकाणच्या शैक्षणिक संस्था व इतर सामाजिक व सांस्कृतिक मंडळाच्या समन्वयातून रंजनात्मक कार्य व्हावे या हेतूने प्रयत्न करणे आवश्यक आहे.
11.स्वयंसेवी युवक मंडळाच्या उपक्रमावर देखरेख ठेवणारी प्रभावी यंत्रणा असावी.
12.युवक मंडळाच्या उपक्रमाला प्रसिद्धी माध्यमाद्वारे प्रसिद्धी मिळाल्यास ग्रामीण व आदिवासी भागात युवा केंद्राचा प्रसार व प्रचार होण्यास गती येईल.
13.ग्रामीण सडक, तलाव, कालवे, नदी शुद्धीकरण या करीता युवकांचे शिबीर आयोजित करावे व त्यांच्या श्रमाचे मानधन देण्यात यावे.

### *संदर्भ :*

1.शालेय शिक्षण व क्रीडा व युवक सेवा संचालनालय कार्यक्रम अंदाजपत्रक 2002 ते 2008.
2.क्रीडा व युवकसेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, विविध योजना मार्गदर्शिका
3.महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण 2001
4.कोकण व उत्तर महाराष्ट्र विभागातील उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा यांच्या जिल्हयातील जिल्हानिहाय योजना त्याकरिता कमी/अधिक खर्च व अंमलबजावणी दस्तऐवज.
5.सन 2002–2007 महाराष्ट्र राज्यातील कार्यक्रम अंदाजपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासकीय मुद्रणालय, पूणे.



***प्रविण लामखाडे***
राणी इंदिराबाई भोसले महा.कुही, तह.कुही, जि.नागपूर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net